माहितीचा अधिकार

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये
प्राप्त झालेली तक्रार
तक्रार क्रमांक : ७०/२०२४

तक्रारकर्ता, ॲड. केशव राजेनिंबाळकर ,
रा. २/२, निवारा बिल्डिंग, सहयोगनगर, बीड

विरुध्द

जन माहिती अधिकारी विद्युत निरीक्षक कार्यालय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, खामगांव, ता.खामगांव, जि.बुलढाणा

प्रथम अपिलीय अधिकारी तथा विद्युत निरीक्षक, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, खामगांव, ता.खामगांव, जि.बुलढाणा

द्वितीय अपील आदेशाचा दिनांक	आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक	मूळ तक्रार अर्जाचा दिनांक
२२.०८.२०२३	-	०५.०२.२०२४

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र.६३२/२०२३, दि. १७.०८.२०२३ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे.

अपिलार्थी ॲड. केशव राजेनिंबाळकर यांनी आपल्या कार्यालयास दाखल केलेल्या दि. ३०.१२.२०२२ रोजीच्या प्रथम अपिल अर्जावर आदेश पारीत करण्यात आलेत नाहीत. त्यामुळे अपीलार्थी यांनी आयोग कार्यालयाकडे दि. २४.०२.२०२३ रोजी व्दितीय अपिल दाखल केले. सदर व्दितीय अपिल संदर्भात आयोगाच्या दि. १७.०८.२०२३ आदेशान्वये सदर प्रकरणी प्रथम अपिलाची सुनावणी घेऊन स्वयंस्पष्ट आदेश पारित करावे असे आदेशीत करण्यात आले. तथापि, अद्यापपर्यंत आपल्या कार्यालयाकडून प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेवून आदेश पारीत करण्यात आले नाहीत. त्यामुळे अपीलार्थी यांनी आयोग कार्यालयात तक्रार दाखल केली आहे.

सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र. केमाअ-२००७/११८२/प्र.क्र.६५/०७/६, दि.१२.१२.२००७, शासन परिपत्रक क्र. केमाअ-२००८/६८८/प्र.क्र.२१९/०८/६, दि. १०.०६.२००८, शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१४ प्र.क्र.२४०/६, दि. १३.०२.२०१५ **नुसार** प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाची सुनावणी घेण्याबाबत **तसेच राज्य माहिती आयोगाकडून पारीत होणाऱ्या निर्णय/निर्देश इत्यादीचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत निर्देशीत करण्यात आले** आहे.

तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी न घेतल्यास अपिलार्थी यांनी त्या अनुषंगाने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल केले असल्यास असे व्दितीय अपिल सुनावणी न घेता सदर प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेण्यात यावी. असे स्पष्ट आदेश मा. उच्च न्यायालय यांनी दिले आहेत. आयोगाकडे प्राप्त व्दितीय अपिलाचे अवलोकन केले असता, मा. उच्च न्यायालयाच्या आदेशास अनुसरुन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलावर सुनावणी घेणे अपेक्षीत

असल्याने प्रथम अपीलावर सुनावणी घेण्यासाठी दि. ११.१२.२०२३ रोजी आदेश निर्गमित करण्यात आले आहे. तथापि, सदर प्रकरणी अद्यापही प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी आयोजीत करुन आदेश निर्गमित केले नाहीत, ही बाब गंभीर आहे. तसेच मा. उच्च न्यायालयाचा अवमान करणारी आहे. तरी सदर प्रकरणी त्वरीत प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात येवून योग्य ते स्वयंसष्ट आदेश पारीत करण्यात यावेत.

तसेच प्रस्तुत प्रकरणी दाखल केलेल्या जोडपत्र-अ मध्ये अपिलार्थी ॲड.केशव राजेनिंबाळकर यांनी मागितलेली माहिती ही आपल्या अधिनस्त कार्यालयात संबधातील विविध कामासंबधात किवा नागरिकाना देत असलेल्या सेवा अथवा कार्यालयात नियुक्त झालेल्या अधिकारी व कर्मचारी यांची माहिती जाणून घेण्याचा अधिकार हा नागरिकांना आहे व त्यामुळे अपिलार्थी ॲड. केशव राजेनिंबाळकर यांनी दाखल केलेला प्रस्तुत जोडपत्र-अ मधील माहिती ही खर तर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४ (१) नूसार स्वयंप्रेरणेने उघड करणे अपेक्षीत असून, या बाबतीत **मा.सर्वोच्च न्यायालय यांनी रिट पिटीशन (सिव्हील) ९९०/२०२१ किशनचंद जैन विरुध्द युनियन बँक ऑफ इंडीया यात दि.१७.०८.२०२३ रोजी** दिलेल्या आदेशात सर्व सार्वजनिक प्राधिकरणाने त्यांचे अख्त्यारित असलेले (Information Held by Such Authorites) ही स्वयंप्रेरणेने उघड करुन शक्यतो स्वत:च्या अधिकृत संकेतस्थळावर अथवा कार्यालयात नागरिकांना ठळकपणे दिसेल अशा ठिकाणी उपलब्ध करुन देणे हे बंधनकारक असून, संबंधित माहिती अर्जाचा विषय विद्युत ठेकेदाराच्या माहिती संदर्भात असल्यामुळे ती उघड केल्याने साध्य होणारे व्यापक जनहित हे कलम ८ (२) च्या तरतुदीनूसार अधिक व्यापक असल्याने व अशी माहिती प्रकट केल्याने साध्य होणारे लोकहित हे संरक्षित हितसंबंधास होणाऱ्या हानिपेक्षा अधिक असेल तर, ती जन माहिती अधिकारी यांना उघड करण्याची कायद्यातील तरतूद लक्षात घेता, विषयांकीत विद्युत ठेकेदाराच्या माहिती संदर्भात असून, ती जाणून घेण्याचा आहे. त्यामुळे वरील कागदपत्रे हे संबंधित प्राधिकरणाने केवळ अपिलार्थीस देणे अपेक्षीत नसून, ती स्वत:च्या शासकीय अधिकृत संकेतस्थळावर देखील उपलब्ध करुन देणे अपेक्षीत आहे ही वस्तुस्थिती लक्षात घेता, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही विनामुल्य उपलब्ध करुन देण्याचे निर्देश जारी करण्यात येत आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या सर्वच विभागांवर विभाग खाते तसेच शासनाच्या अख्त्यारितील विविध प्राधिकरणाने राबविलेल्या योजना, जनतेला पुरविण्यात आलेल्या सेवा आस्थापना विषय खर्च त्या संबधातील आदेश सार्वजनिक संकेतस्थळावरच उपलब्ध करुन देण्याबाबत प्रशासकीय पातळीवर योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येत आहे. यास्तव तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

आदेश

उपरोक्त आदेशाच्या अधिन राहून तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय अमरावती विभाग, अमरावती

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ अमरावती

ठिकाण : अमरावती
दिनांक : ०४.०४.२०२४

जावक क्रमांक 3848 दिनांक 09 MAY 2024